# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर

ग्राहक तक्रार क्र. १८ ते ४८/२००६/ दिनांक :

१) श्री. आण्णासो आप्पासो बिराजदार, काराजनगी, ता.जत
२) श्री. गुलाबराव भाऊसाहेब करे, करेवाडी खुर्द, ता.जत
३) श्री. पांडुरंग कृष्णा माने, येळावी, ता.जत
४) श्री. भिमू बाळकू सावंत, माडग्याळ, ता.जत
५) श्री. यल्लाप्पा कल्लाप्पा माळी, व्हसपेठ,ता.जत
६) श्री. महादेव रेवाप्पा माळी, व्हसपेठ, ता.जत
७) श्री. शंकर तुका गोधे, बाज, ता.जत
८) श्री. ईश्वरा भैरू माने, बागेवाडी, ता.जत
९) श्री. भाऊ नाना यमगर, कोसारी, ता.जत
१०) श्री. वसंत बंडू कोडग, शेगांव, ता.जत
११) श्री. दिगंबर बंडू कोडग, शेगांव, ता.जत
१२) श्री. प–याप्प शंक–याप्पा केंपवाड, खोजनवाडी,ता.जत
१३) श्री. आंबाण्णा लक्ष्मण माळी, उमराणी, ता.जत
१४) श्री.यल्लाप्पा दादा मालेकर, अचकहळळी, ता.जत
१५) श्री. बाळू भंगाप्पा रूपनुर, बाज, ता.जत
१६) श्री. बाळासाहेब शिवलिंग कुंभारे, बाज, ता.जत
१७) श्री. गुंडा बाबाजी गडदे, बाज, ता.जत
१८) श्री. तुकाराम यशवंत गडदे, बाज, ता.जत
१९) श्री. ज्ञानु धुळा गडदे, बाज, ता.जत
२०) श्री. विठोबा मारूती गडदे, बाज, ता.जत
२१) श्री. साधू तातोबा खांडेकर, बिरनाळ, ता.जत
२२) श्री. रावसाहेब शंक–याप्पा बेळगी, मेंढीगिरी, ता.जत
२३) श्री. शिवाजी गणू दुधाळ, देवनाळ, ता.जत
२४) श्री. आप्पालाला मेहबूब मुजावर, आसंगी तु.,ता.जत
२५) श्री. ज्ञानू कृष्णा पाटील, घोलेश्वर, ता.जत
२६) श्री. पांडुरंग रामचंद्र जमदाडे, गिरगांव, ता.जत
२७) श्री. ज्ञानोबा महादेव निकम, शेगांव, ता.जत
२८) श्री. बाबू भिरू सोनुरे, अचकनहळ्ळी, ता.जत
२९) श्री. आण्णू बाळू बुरूंगळे, नवाळवाडी, ता.जत
३०) श्री. ज्ञानेश्वर केशव मोरे, आमृतवाडी, ता.जत
३१) श्री. भगवान बंडू पुजारी, कोसारी, ता.जत
तर्फे श्री. एच.डी. खापरे, प्रतिनिधी, रा.जत,जिल्हा–सांगली.

तक्रारदार

**<u>विरूध्द</u>**

| | |
|---|---|
| १) कार्यकारी अभियंता(का) तथा नोडल ऑफीसर,<br>म.रा.विद्युंत वितरण कंपनी मर्यादित,<br>मंडल कार्यालय, विश्रामबाग, सांगली.<br>२) कार्यकारी अभियंता,<br>म.रा.विद्युंत वितरण कंपनी मर्यादित,<br>संवसु ग्रामीण विभाग,<br>सांगली.<br>३) सहाय्यक अभियंता,<br>म.रा.विद्युंत वितरण कंपनी मर्यादित,<br>उपविभागीय कार्यालय जत,<br>जत जि. सांगली.<br>४) सहाय्यक अभियंता,<br>म.रा.विद्युंत वितरण कंपनी मर्यादित,<br>उपविभागीय कार्यालय संख,<br>संख, जि. सांगली.<br>सर्व महावितरण कंपनीचे वतीने – | विरूध्द पक्षकार |

**कोरम :–** १) श्री. के.व्ही. पाटील, अध्यक्ष
२) श्री. जी.सी. लेले, सदस्य
३) एम.बी. भाजीभाकरे, सदस्य–सचिव

महाराष्ट्र वीज नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतूदीनुसार.

प्रस्तुतचे तक्रारदार यांनी मंडल पातळीवरील कार्यकारी अभियंता तथा अध्यक्ष, अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली यांचेकडे विहीत "क्ष" नमुन्यात अर्ज करून तक्रार नोंदविली होती. त्याकामी कक्षाने दिलेला निर्णय मान्य न झाल्यान महाराष्ट्र वीज नियामक आयोग (ग्राहक गा–हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम २००६ मधील ६.४ चे तरतुदीनुसार श्री. आण्णासो आप्पासो बिराजदार व इतर ३०, ता.जत, जि.सांगली. यांनी ग्राहक तक्रार निवारण मंच, कोल्हापूर परिमंडल, कोल्हापूर येथे दि. २२/६/२००६ रोजी अनुसूची "अ" मध्ये अर्ज केले आहेत. सदरच्या अर्जातील सर्व तक्रारदारांची कृषी पंपासाठी वीज पुरवठा मागणी असून त्यांच्याशी वि.प. हे एकमेव संबंधित असल्याने त्या सर्व तक्रारी अर्जाची सुनावणी एकत्रित करण्यात आली आहे. त्याबाबत दि. ८/८/२००६ रोजी झालेल्या सुनावणीच्यावेळी तक्रारदारांच्यावतीने उपस्थित असलेले श्री खापरे, तक्रारदारांचे प्रतिनिधी व वि.प. यांचेशी याबाबत सुरूवातीस चर्चा करून त्यानुसार एकत्रितपणे अर्जांची सुनावणी घेण्याचे ठरविण्यात आले. तसे करण्याबाबत तक्रारदारांचे प्रतिनिधी यांनी लेखी स्वरूपांतही विनंती केली आहे.

२) अर्जदारांच्या तक्रारीचे स्वरूप पाहता ते खालीलप्रमाणे असल्याचे दिसून येते :–

(१) तक्रारदार यांनी शेती पंपास वीज पुरवठा करण्यासाठी आवश्यक असलेली डिपॉझिटची रक्कम महावितरण कंपनीकडे ब–याच वर्षापूर्वी भरलेली आहे. तथापि कंपनीने आजपर्यंत शेती पंपास वीज पुरवठा केलेला नाही.

(२) या कामी तक्रारदारांनी दि. २१/३/२००६ रोजी कार्यकारी अभियंता(का.) तथा अध्यक्ष, अंतर्गत ग्राहक तक्रार निवारण कक्ष, म.रा.वि.वि.कं.लि., मंडल कार्यालय, सांगली यांच्याकडे नियमानुसार विहीत “क्ष” नमुन्यामध्ये रितसर तक्रार नोंदविली आहे.

(३) सदरची तक्रार नोंदवूनही आजतागायत शेती पंपास वीज पुरवठा मिळालेला नाही. त्यामुळे ग्राहकांची तक्रार निवारण झालेली नाही.

(४) महाराष्ट्र वीज नियामक आयोगाकडील दि. १/६/२००६ चा आदेश विचारात घेऊन विद्युत अधिनियम २००३ चे कलम ४३ नुसार तक्रारदारांच्या शेती पंपाना त्वरित वीज पुरवठा देण्याबबतचे आदेश मंचाने महावितरण कंपनीस द्यावेत तसेच महाराष्ट्र वीज नियामक आयोग (वितरण परवाना धरकांच्या कृतींची मानके, विद्युत पुरवठा सुरू करावयाचा कलावधी आणि भरपाईचे निश्चितीकरण) विनियम २००५ च्या तरतुदीनुसार दि २०/१/२००५ पासून प्रत्यक्ष शेती पंपास वीज पुरवठा करण्यांत येईल त्या तारखेपर्यंत विलंबाच्या प्रति आठवडयास किंवा त्याच्या भागास रू. १०० प्रमाणे ग्राहकास नुकसान भरपाई मिळावी

३) अंतर्गत ग्राहक तक्रार निवारण कक्ष, सांगली यांनी या सर्व तक्रारी अर्जाचे कामी सुनावणी न करता कार्यकारी अभियंता (ग्रा.), सांगली यांचेकडून अहवाल मागवून त्याचे आधारे दि. १५/५/०६, १८/५/०६ व १५/६/२००६ रोजी तक्रारदार यांना उत्तर पाठविल्याचे दिसून येते. सदरचा पत्रव्यवहार हा कार्यालयीन कामाकाजाचा भाग असल्याचे कार्यकारी
अभियंता तथा अध्यक्ष, अंतर्गत ग्राहक तक्रार निवारण कक्ष, सांगली यांचे निदर्शनास आणून दिल्यानंतर कक्षाने दि. २६/७/२००६ रोजी पत्रसदृष्य आदेश तयार करून संबंधित तक्रारदारांना तसेच श्री. खापरे, ग्राहक प्रतिनिधी, यांना कळविले आहे. या आदेशातील मजकुर पाहता सर्व तक्रारादारांनी महाराष्ट्र वीज नियामक आयोग (विद्युत पुरवठा संहिता आणि पुरवठयाच्या इतर अटी ) विनियम २००५ चे कलम ३.३ अन्वये वितरण कंपनीकडे अंदाजपत्रकातील सर्व रक्कम भरावी अथवा ओ.आर.सी अंतर्गत १५ टक्के देखभाल रक्कम भरून मान्यताप्राप्त ठेकेदाराकडून स्वखर्चाने लाईनची उभारणी करावी या सर्व बाबींची तक्रारदाराने पूर्तता करताच वितरण कंपनीने तातडीने वीज पुरवठा करावा असे सांगितल्याचे दिसून येते. सदरच्या आदेशामध्ये पुढे असेही नमूद केले आहे की. तक्रारदार यांनी वितरण कंपनीकडे विलंबाबत दंड आकारणीची केलेली मागणी त्यांनी केलेल्या तक्रारीबाबत लागू होत नसल्यामुळे त्यांनी केलेली भरपाईची मागणी अंतर्गत तक्रार निवारण कक्षाकडून फेटाळण्यात येत आहे.

४) प्रकरणी सुनावणीची ता. २/८/२००६ रोजी नेमण्यांत आली होती. तथापि श्री. खापरे, तक्रारदारांचे प्रतिनिधी, यांनी महापुरामुळे रस्ते बंद असल्याच्या कारणावरून पुढील तारीख मिळण्यासाठी विनंती अर्ज पाठविला त्यानुसार पुढील सुनावणीची ता. ८/८/२००६ रोजी नेमण्यांत आली. सदरचे दिवशी तक्रारदारांचे प्रतिनिधी तसेच वि.प. उपस्थित राहून त्यांनी म्हणणे मांडले. सुनावणीचे वेळी श्री. खापरे यांनी लेखी म्हणणेही सादर केले. त्यामध्ये त्यांनी तक्रारदार क्र. १ ते ३१ यांच्या तक्रारी शेती पंपास वीज पुरवठा करण्याबाबत असल्याने व त्यासर्व

वि.प.शी संबंधित असल्याने त्या सर्वासाठी एकत्रांत युक्तिवाद सादर केल्याचे म्हटले आहे. वि.प. यांनीही एकत्रांत सुनावणी घेऊन तसे आदेश देण्यासाठी मंचाकडे विनंती केली. मंचाने तक्रारदारांचे प्रतिनिधी तसेच वि.प. यांच्या म्हणण्याची पडताळणी करून एकत्रित सुनावणी करण्याचे व त्याप्रमाणे निकाल देण्याचे मान्य केले.

५) दि ८/८/२००६ रोजी सुनावणीच्यावेळी तक्रारदारांचे प्रतिनिधी श्री. खापरे, यांनी विहीत "क्ष" नमुन्यामध्ये नमूद केल्या प्रमाणे ग्राहकांच्या तक्रारी सविस्तरपणे मांडल्या. त्यावेळी त्यांनी मंचाच्या असेही निर्दशनास आणून दिले की, संबंधित शेतक–यांनी डिपॉझिटची रक्कम भरून तसेच चाचणी अहवाल महावितरण कंपनीकडे दहा वर्षापूर्वी सादर करूनही त्याकडे महावितरण कंपनीने अन्य कारणांची सबब सांगून दुर्लक्ष केले आहे. त्यामुळे तक्रारदारांना मंडल पातळीवरील अंतर्गत ग्राहक तक्रार निवारण कक्षाकडे दाद मागणे भाग पडले होते. मात्र त्या ठिकाणीही तक्रारदारास न्याय न मिळाल्याने मंचाकडे प्रस्तुतचे अपील केले आहे. श्री. खापरे, यांच्या म्हणण्या नुसार महावितरण कंपनीकडे याकामासाठी पुरेसा निधी उपलब्ध आहे अगर कसे, त्यांना आर्थिक वर्षासाठी दिलेले उद्दिष्ट किती आहे, तसेच वितरण कंपनीकडे वीज पुरवठा करण्यासाठी आवश्यक असलेले साहित्य उपलब्ध आहे अगर कसे यांच्याशी तक्रारदारांचा कसलाही संबंध नाही याउलट दि. १/६/२००६ रोजी महाराष्ट्र वीज नियामक आयोगाने दिलेल्या आदेशामध्ये यासर्वही गोष्टींचा पूर्णपणे विचार करून महावितरण कंपनीने मांडलेल्या मुद्यांचे खंडण केले आहे. तसेच या निकालानुसार महावितरण कंपनीने कृतीच्या मानके नुसार ग्राहकास वीज पुरवठा करणे आवश्यक आहे. श्री. खापरे, यांनी पुढे असेही सांगितले की, महाराष्ट्र वीज नियामक आयोग (वितरण परवाना धरकांच्या कृतींची मानके, विद्युत पुरवठा सुरू करावयाचा कालावधी आणि भरपाईचे निश्चितीकरण) विनियम २००५ अनुसूची "अ" चे तरतुदीनुसार कृती मानकाप्रमाणे ग्राहकांना वीज पुरवठा मिळणे आवश्यक आहे. त्यामध्ये शेती पंपांना वीज पुरवठा करणेस अपवाद करण्यात आलेला नाही. यावरून ग्राहकांने कोणत्याही कारणासाठी वीज पुरवठयाची मागणी केल्यास त्यांस कृती मानकानुसार वीज पुरवठा करणे कायद्याने बंधनकारक आहे. वीज वितरण कंपनीकडे शेती पंपासाठी वीज पुरवठा करण्यासाठी अत्यावश्यक असलेले सर्व साहित्य उपलब्ध असूनही तसेच कांही तक्रारदारांच्या शेतामध्ये प्रत्यक्ष पोल उभे करूनही त्यांना आजतागायत वीज पुरवठा करण्यात आलेला नाही. ही वस्तुस्थिती विचारात घेऊन जर वीज वितरण कंपनीने ३ महिन्यांच्या कालावधीत संबंधित सर्व तक्रारदारांच्या शेती पंपांना वीज पुरवठा केल्यास विलंबाच्या कारणास्तव प्रति आठवडयास किंवा त्या भागास मागणी केलेली रू. १००/– प्रमाणे नुकसान भरपाई ते सोडून देण्यास कबूल आहेत. सबब मंचाने ग्राहकांच्या तक्रारींचा विचार करून १९९६ पासून प्रलंबित असलेल्या मागणीबाबत योग्य न्याय द्यावा.

६) वीज वितरण कंपनीचे वतीने वि.प. समक्ष उपस्थित राहून त्यांनी आपली बाजू मांडली. त्यावेळी संबंधित कार्यकारी अभियंता यांनी मंचाच्या निर्दशनास असे आणून दिले की, जत तसेच संख उपविभागामध्ये जी प्रतिक्षा यादी तयार करण्यात आलेली आहे त्यामधील १९९८ पर्यंतच्या ग्राहकास मार्च, २००७ पर्यंत वीज पुरवठा करण्याचे अपेक्षित आहे. वि.प. यांनी पुढे असेही सांगितले की सांगली मंडलातील जत व संख उपविभाग वगळता इतर सर्व उविभागांतील २००० पर्यंतच्या प्रतिक्षा यादीतील अर्जदारांच्या शेती पंपास वीज पुरवठा करण्यांत आला आहे. मात्र संख व जत उपविभागांतील १९९६ पर्यंतच्या प्रतिक्षा यादीतील अर्जदारांच्या शेती पंपास पुरवठा करण्यांत आला आहे व उर्वरित अर्जदार अद्यापि प्रतिक्षा यादीवर आहेत. सुनावणीचे वेळी वि.प. यांनी जत व संख उपविभागास सन २००६–२००७ साठी दिलेल्या उद्दिष्टाबाबत सविस्तर कथन केले तरीसुध्दा जर तक्रारदारांना प्राधान्याने शेती पंपासाठी वीज पुरवठा पाहिजे असेल तर त्यांनी महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

(विद्युत पुरवठा संहिता आणि पुरवठयाच्या इतर अटी) विनियम २००५ चे कलम ३.३ नुसार वितरण कंपनीकडे अंदाजपत्रकतील सर्व रक्कम भरणे गरजेचे आहे अथवा या तक्रारदारांनी ओ.आर.सी. अंतर्गत १५ टक्के देखभाल रक्कम भरून मान्यताप्राप्त ठेकेदाराकडून स्वखर्चाने लाईनची उभारणी केल्यास त्यांना वितरण कंपनी तातडीने वीज पुरवठा करू शकेल असे सांगितले. तक्रारदारांनी मागणी केलेल्या विलंबाच्या दंड आकारणीबाबत त्यांनी पुढे असे सांगितले की, तक्रारदारांनी वरील प्रमाणे तरतुदीची पूर्तता न केल्याने त्यांना नुकसान भरपाई मागण्याचा कसलाही अधिकार नाही. सबब तक्रारदार यांनी मागणी केलेली नुकसान भरपाईची
रक्कम त्यांना देता येणार नाही. वितरण कंपनीचे सहाय्यक अभियंता, जत तसेच संख यांनी असे सांगतिले की, त्यांना शासनाने दिलेले वार्षिक उद्दिष्ट, उपलब्ध केलेला अपुरा निधी तसेच पुरेशा साहित्याचा अभाव यांचा विचार करतां तक्रारदारांच्या अपेक्षेप्रमाणे वीज वितरण कंपनीस वीज पुरवठा करणे शक्य होणार नाही महाराष्ट्र वीज नियामक आयोगाने दि. १/६/२००६ रोजी दिलेल्या निकाला संदर्भात वि.प. चे वतीने असे सांगतिले की, या निर्णयावर महावितरण कंपनीने अपील केले असून त्याबातचा निर्णय अद्यापि प्रलंबित आहे. त्यामुळे शेती पंपाना वीज पुरवण्यासाठी कृती मानकांच्या तरतुदी या प्रकरणी लागू करणे कायदेशीर तसेच न्यायाचे होणार नाही.

७) तक्रारदार तसेच वि.प. यांनी सादर केलेला पुरावा तसेच सुनावणीचे दिवशी सादर केलेले कथन विचारांत घेता प्रकरणी खालील वस्तुस्थिती असल्याचे दिसून येते –

सर्वश्री आण्णासो आप्पासो बिराजदार व इतर ३० तक्रारदारांनी आपल्या शेती पंपास वीज पुरवठा करण्यासाठी वि.प.कडे सन १९९६ पासून मागणी केली आहे. अर्जदारांनी याकामी आवश्यक असलेली डिपॉझीटची रक्कम व चांचणी अहवालही वि.प. यांना सादर केला आहे. त्यानुसार ३१ तक्रारदारांची वर्ष–निहाय शेती पंपास वीज पुरवठा मागणीची संख्या सन १९९६, १९९७, १९९८, १९९९ व २००२ नंतरची अनुक्रमे ७,८,९,३ व ४ अशी येत आहे मार्च–२००४ पूर्वी शेती पंपास वीज पुरवठा मागणी करणा–या शेतक–यांचा जत उपविभागाचे प्रतिक्षा यादीमध्ये समावेश करण्यांत येत होता. त्यानंतर जत उपविभागाचे विभाजन होऊन "जत " व "संख " असे दोन उपविभाग करण्यांत आले. त्यानुसार तक्रारदारापैकी जत व संख उपविभागांसाठी तयार करण्यांत आलेल्या प्रतिक्षा यादीमध्ये अनुक्रमे २ व २९ तक्रारदारांचा समावेश असल्याचे उपलब्ध कागदपत्रपावरून दिसून येते. या तक्रारादारांच्या शेती पंपास प्रतिक्षा यादीतील ज्येष्ठतेनुसार वीज पुरवठा करण्यांत येईल असे वि.प. यांनी सुनावणीचेवेळी सांगितले. मात्र पुराव्याचे कागदपत्रावरून वि.प. यांनी संख व जत उपविभागासाठी जी प्रतिक्षा यादी तयार केली आहे ती अत्यंत सदोष असल्याचे दिसून येते उदा. श्री. आंबाण्णा शंकर माळी यांनी दि. १५/४/१९९६ रोजी डिपॉझीटची रक्कम भरल्याने त्यांचा प्रतिक्षा यादींत क्र ५ आहे. मात्र त्यानंतर म्हणजे दि ३०/४/१९९६ रोजी श्री. आण्णासो आप्पासाहेब बिराजदार यांनी डिपॉझीट रक्कम भरूनही त्यांचा क्र. ४ असल्याचे दिसून येते. तसेच सर्वश्री अनंत बंडू कोडग व दिंगंबर कोडग यांनी दि. १९/८/१९९७ रोजी डिपॉझीट भरून त्यांना क्र. २०३ व २०४ दिला आहे मात्र श्री पांडुरंग कृष्णा माने यांनी दि. १४/१०/१९९७ रोजी डिपॉझीट भरूनही त्यास क्र. १६५ दिला आहे. प्रतिक्षा यादीतील क्रमांक हे अर्जदाराने डिपॉझीटची रक्कम भरल्याचे तारखेवर आधारीत असल्याचे वि.प. यांनी सुनावणीचेवेळी सांगितले. यावरून वि.प. यांनी प्रतिक्षा यादी करतांना आवश्यक ती काळजी घेतली नसल्याचे स्पष्टपणे दिसून येते. सदरची प्रतिक्षा यादी संबंधित उपविभागीय कार्यालयाच्या दर्शनी ठिकाणी प्रसिध्दीसाठी / ग्राहकांच्या माहितीसाठी ठेवली आहे अगर कसे याबाबत मंचाने विचारणा केली असता वि.प. ला समाधानकारकपणे खुलासा करतां आला नाही. प्रतिक्षा यादी

सारख्या आधारभूत बाबीविषयी जर विप. उदासीन असेल तर त्यावरून शेती पंपास वीज पुरवठा मागणी करणा–या शेतक–यांवर /



तक्रारदारांवर कायमपणे अन्यायच होत रहाणार यांत शंका नाही. याबाबत मंचाचे असे स्पष्ट मत आहे की, विप. यांनी तातडीने कार्यवाही करून सर्व प्रतिक्षा यादीतील शेतक–यांना / मागणीदारांना न्याय देण्याचे पाऊल उचलावे. या अत्यंत महत्वाच्या बाबीकडे दुर्दैवाने अंतर्गत तक्रार निवारण समितीनेही दुर्लक्ष केल्याचे दिसून येते.

८) वीज ग्राहकाच्या तक्रारीचे वेळीच निवारण करण्याचे उद्‌देशाने महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा–हांणे निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम २००६ चे कलम ६.१ मधील तरतूदीनुसार वितरण परवानेधारकाने प्रत्येक महसूल जिल्हांत (मंडल पातळीवर) “अंतर्गत गा–हाणे निवारण कक्ष “ स्थापन करण्यात आला आहे. वितरण परवाने धारकाकडे येणा–या गा–हांण्यांच्या नोंदी ठेवण्यासाठी व त्यांचे वेळीच निराकरण करण्यासाठी या स्वतंत्र व्यवस्थेची निर्मिती करण्यांत आली आहे. एवढेच नाहीतर जेंव्हा ग्राहकास आपले म्हणणे लेखी मांडता येत नसेल तेंव्हा तोंडी गा–हाणे मांडणा–या व्यवक्तिला त्याचे गा–हाणे लेखी सादर करता यावे यासाठी सदरचे कक्षाने त्याला योग्य ती सर्व मदत करण्याची आहे. या अंतर्गत गा–हाणे निवारण कक्षामार्फत वितरण परवाने धारकाने ग्राहकाची तक्रार निवारण करण्याचे अपेक्षित आहे यावरून कक्षाने वितरण कंपनीकडील ग्राहकाच्या तक्रारी ज्या त्या पातळीवरून निवारण करणे गरजेचे आहे. याची जाणीव ठेवून अंतर्गत तक्रार निवारण कक्षाने कामकाज करणे अत्यावश्यक आहे. याऊलट अर्जदारांचे तक्रारी कामी कक्षाने कार्यकारी अभियंता, सांगली ग्रामीण विभाग यांचेकडून अहवाल मागवून तक्रारदारांना कळविण्यापलिकडे कसलीही उपायायोजना केली नसल्याचे दिसून येते. वास्तवीक पहाता वीज विरण कंपनीने अर्जदाराच्या तक्रारीची दखल न घेतल्याने त्याला अंतर्गत ग्राहक तक्रार निवारण कक्षाकडे धांव घ्यावी लागली आहे. मात्र तेथेही जर ग्राहकाची तक्रार निवारण झाली नाही तर तक्रारदाराने सतत धडपडत रहाण्यापलीकडे हाती कांहीच असणार नाही असे मंचास म्हणावेसे वाटते. यावरून अंतर्गत तक्रार निवारण कक्षाने आली महत्वपूर्ण भूमिका बजावून तक्रारदारास योग्य न्याय मिळवून देण्याचे दृष्टीने प्रयत्न करणे आवश्यक आहे. त्यास विनियम २००६ चे तरतुदी नुसार कक्ष बांधील आहे.

९) महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वितरण परवाना धरकांच्या कृतींची मानके, विद्युत पुरवठा सुरू करावयाचा कालावधी आणि भरपाईचे निश्चितीकरण) विनियम २००५ ची अंमलबजावणी दि. २०/१/२००५ पासून करण्यात आली आहे. त्यामधील कलम ३.१ चे लगत परिशिष्ट अ प्रमाणे कार्यवाही करणे विद्युत परवानेधारक यांना कायद्याने बंधनकारक आहे आणि जर याकामी विद्युत परवानेधारक यांना अपयश आले तर ते कलम ३.२ अन्वये कार्यवाही करण्यास पात्र ठरतात. वि.प यांनी सुनावणीच्यावेळी असे सांगितले की, त्यांना अस्तित्वात असलेल्या जाळयातून जोडणी देणे शक्य नाही तथापि वितरण मेन्सचा विस्तार अथवा वाढ करून १९९८ पर्यंतच्या तक्रारदारास वीज पुरवठा करणे शक्य होईल. ही बाब गृहीत धरल्यास विनियम २००५ चे तरतुदीनुसार ग्राहकाने वीज पुरवठयासाठी वितरण परवानेधारक यांचेकडे केलेला अर्ज प्राप्त झालेच्या तारखेपासून तीन महिन्यांचे मुदतीत वीज कनेक्शन देणे बंधनकारक आहे. शेती पंपास वीज पुरवठा करण्यासाठी एस.ओ.पी. मध्ये कोणताही अपवाद केलेला नाही. श्री. खापरे यांनी सुनावणीच्यावेळी सांगितल्याप्रमाणे वि.प. यास याकामी पुरेसा निधी उपलब्ध आहे अगर कसे किंवा निधी उभारण्यासाठी शासनाची संमत्ती मिळविणे अडचणीचे होते अगर कसे, वितरण कंपनीकडे वीज पुरवठया करण्यासाठी पुरेसे साहित्य उपलब्ध आहे अगर कसे तसेच त्यांना आर्थिक वर्षासाठी दिलेले उद्‌दिष्ट किती आहे याच्याशी तक्रारदाराचा कसलाही संबंध नाही. शिवाय दि. १/६/२००६

रोजी महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने दिलेल्या आदेशामध्ये यासर्व गोष्टीचा पूर्णपणे विचार करून शेती पंपास वीज पुरवठा करण्याबाबत वीज वीतरण कंपनीने मांडलेले सर्व मुद्दे फेटाळलेले आहेत. सदरचे निकालाबाबत



वितरण परवानेधारकाने असे सांगितले की, वितरण कंपनीने त्याविरूध्द अपील दाखल केले असून त्याचा निर्णय अद्यापि प्रलंबित आहे. यावरून शेती पंपास वीज पुरवठा करण्यासाठी एस.ओ.पी. मधील तरतूदी लागू करण्याची बाब न्यायप्रविष्ट असल्याचे स्पष्ट होत आहे. असे जरी असले तरी सन १९९६ पासून शेती पंपास वीज पुरवठा मागणीसाठी प्रतिक्षा यादीवर असलेल्या ग्राहकास १० वर्षांनंतर वि.प. यांनी दि २६/७/२००६ रोजी आदेश दिल्याप्रमाणे (विद्युत पुरवठा संहिता आणि पुरवठयाच्या इतर अटी) विनियम २००५ चे कलम ३.३ मधील तरतूदीनुसार वितरण कंपनीकडे अंदाजपत्रकांतील सर्व रक्कम भरण्यास सांगणे अथवा ओ.आर.सी. अंतर्गत १५ टक्के देखभाल रक्कम भरून मान्यताप्राप्त ठेकेदाराकडून स्वखर्चाने लाईनची उभारणी करण्यास सांगणे अयोग्य तसेच अन्यायाचे होईल असे मंचाचे अध्यक्ष व सदस्य यांचे ठाम मत आहे. त्याशिवाय सन २००६–२००७ या वर्षासाठी जत व संख उपविभागास दिलेले उद्दिष्ट विचारांत घेता तसेच शेती पंपास वीज मागणी करणा–या अर्जदारांची प्रतिक्षा यादी पहातां तक्रारदारांसह अन्य अर्जदारास (१९९९ अखेर प्रतिक्षा यादीवर असलेल्या) मार्च २००७ पर्यंत वीज पुरवठा करणे सहज शक्य आहे असे मंचाचे अध्यक्ष व सदस्य यांना वाटते.

**<u>ग्राहक गा–हाणे निवारण मंच, कोल्हापूर परिमंडल, कोल्हापूर या मंचाचा सदस्य–सचिव म्हणून मी माझे मत खालील प्रमाणे नोंदवित आहे व त्याचा सर्वार्थाने विचार होणे गरजेचे आहे:–</u>**

१९९९ अखेर प्रतिक्षा यादीवर असलेल्या सर्व अर्जदारांना मार्च, २००७ पर्यंत विद्युत पुरवठा करणे सहज शक्य आहे असे मंचाचे अध्यक्ष व सदस्य यांना वाटत असले तरी या मंचाचा सदस्य–सचिव हे या मतास सहमत नाहीत कारण सदर कामाकरिता ग्रामीण विद्युतिकरण महामंडळाकडून निधी मंजूर करून घ्यावा लागतो व सदर निधी व ती ही कर्जाऊ रक्कम शासनाची हमी मिळाल्यानंतर हप्त्या–हप्त्याने वितरण कंपनीस प्राप्त होते, त्यामुळे शेती पंपाचे उर्जिकरण शासनाच्या निधी उपलब्धतेवर अवलंबून आहे.

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (विद्युत पुरवठा संहिता आणि पुरवठयाच्या इतर अटी) विनियम २००५ च्या कलम ४.४ नुसार विद्युत परवानेधारक जेथवर शक्य असेल तेथवर वीज दराच्या वर्गवारीतील प्रथम येणा–यास प्रथम प्राधान्य या तत्वावर वीज पुरवठा करील.

एखाद्या ग्राहकास तातडीने क नेक्शन हवे असल्यास महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (विद्युत पुरवठा संहिता आणि पुरवठयाच्या इतर अटी) विनियम २००५ च्या कलम ३.३ मधील उपकलम ३.३.२ व ३.३.४ अन्वये विद्युत वाहिनी उभारणीसाठी येणारा सर्व खर्च भरण्यास तयार असेल अथवा परवानेधारक विद्युत ठेकेदाराकडून वाहिनी उभारणीचे काम करून घेऊन विद्युत परवानेधारकाकडे १५ टक्के देखभाल रक्कम भरण्यास तयार असेल तर त्यांना तातडीने विद्युत पुरवठा करू शकेल.

अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली मंडल, सांगली यांनी सदर प्रकरणी दिनांक २६/०७/२००६ रोजी दिलेला आदेश योग्य आहे असे या मंचाचे सदस्य–सचिव यांचे मत आहे.

सांगली ग्रामीण विभागापैकी जत व संख उपविभागांतून शेती पंपास वीज पुरवठा करण्याचे कामी मोठया प्रमाणांत तक्रारी आल्याने व त्याबाबत एकत्रांत सुनावणी केल्यानंतर कांही कागदपत्रांची पडताळणी करणे आवश्यक वाटल्यामुळे या मंचाला आदेश देण्यास थोडा विलंब झाला आहे.

तक्रारदार व वि.प. यांनी सादर केलेला पुरावा, त्यांनी सुनावणीचेवेळी केलेले कथन व नमुद केलेली वस्तुस्थिती व महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वितरण परवाना धारकांच्या कृतींची मानके, विद्युत पुरवठा सुरू

करावयाचा कालावधी आणि भरपाईचे निश्चितीकरण) विनियम २००५ मधील तरतूदींचा विचार करून मंच बहुमताने खालील प्रमाणे आदेश देत आहे.



# आदेश

(१) अंतर्गत तक्रार निवारण कक्ष सांगली मंडल, सांगली यांनी दिनांक १५/६/२००६ रोजी दिलेले आदेश अंशत: रद्‌द करण्यांत आले आहेत.

(२) प्रचलित दरपत्रकानुसार देय असलेली फरकाची रक्कम व अत्यावश्यक कागदपत्रांची पूर्तता करून घेऊन सन १९९६ ते १९९९ पर्यंत प्रतिक्षा यादीवर प्रलंबित असलेल्या तसेच उर्वरित चार तक्रारदारांच्या शेती पंपास ३१ मार्च, २००७ पर्यंत वि.प. यांनी वीज पुरवठा करावा. अन्यथा विलंबाबद्‌दल तक्रारदारांना विनियम २००५ च्या तरतुदीनुसार नुकसान भरपाईची देय रक्कम मागण्याची मुभा राहील.

(३) जत व संख उपविभागातील शेती पंपास वीज पुरवठा करण्यासाठी तयार केलेली प्रतिक्षा यादी प्राधान्याने तपासून दोषमुक्त करून त्या यादीमध्ये पारदर्शकता आणावी.

(४) सदरच्या आदेशाची अंमलबजावणी विहित मुदतीत करून तसे केल्याचे विनियम २००६ चे कलम ८.३ चे तरतुदीनुसार मंचास १५ एप्रिल, २००७ पर्यंत कळवावे. .

(५) या निर्णयाबद्‌दल तक्रारदार यांना अपील करावयाचे असल्यास त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आत विद्युत लोकपाल “केशवा” बांद्रा–कुर्ला कॉम्लेक्स, बांद्रा(पूर्व), मुंबई–४०००५१ यांचेकडे करता येईल. तसेच वि.प. यांना अपील करावयाचे असल्यास त्यांना मा.ना. उच्च न्यायालय, मुंबई, अथवा दिवाणी न्यायालयात करता येईल.

| | | |
|---|---|---|
| (एम.बी.भाजीभाकरे) | (जी. सी. लेले) | (के. व्ही. पाटील) |
| सदस्य – सचिव | सदस्य | अध्यक्ष |
| ग्रा.त.नि.मंच,कोप,कोल्हापूर | ग्रा.त.नि.मंच,कोप,कोल्हापूर | ग्रा.त.नि.मंच,कोप,कोल्हापूर |

# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## ग्राहक तक्रार निवारण मंच
## कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर

ग्राहक तक्रार क्र. १८ ते ४८/२००६/ दिनांक :

**<u>अत्यंत तातडीचे</u>** :

प्रति,
कार्यकारी अभियंता तथा नोडल ऑफीसर,
म.रा.विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
मंडल कार्यालय, विश्रामबाग,
<u>सांगली.</u>

विषय :– या मंचामध्ये दाखल झालेल्या अपील क्र. १८ ते ४८ चे बाबत.

----

१) श्री. आण्णासो आप्पासो बिराजदार, काराजनगी, ता.जत
२) श्री. गुलाबराव भाऊसाहेब करे, करेवाडी खुर्द, ता.जत
३) श्री. पांडुरंग कृष्णा माने, येळावी, ता.जत
४) श्री. भिमू बाळकू सावंत, माडग्याळ, ता.जत
५) श्री. यल्लाप्पा कल्लाप्पा माळी, व्हसपेठ,ता.जत
६) श्री. महादेव रेवाप्पा माळी, व्हसपेठ, ता.जत
७) श्री. शंकर तुका गोधे, बाज, ता.जत
८) श्री. ईश्वरा भैरू माने, बागेवाडी, ता.जत
९) श्री. भाऊ नाना यमगर, कोसारी, ता.जत
१०) श्री. वसंत बंडू कोडग, शेगांव, ता.जत
११) श्री. दिगंबर बंडू कोडग, शेगांव, ता.जत
१२) श्री. प–याप्प शंक–याप्पा केंपवाड, खोजनवाडी,ता.जत
१३) श्री. आंबाण्णा लक्ष्मण माळी, उमराणी, ता.जत
१४) श्री.यल्लाप्पा दादा मालेकर, अचकहळळी, ता.जत
१५) श्री. बाळू भंगाप्पा रूपनुर, बाज, ता.जत
१६) श्री. बाळासाहेब शिवलिंग कुंभारे, बाज, ता.जत
१७) श्री. गुंडा बाबाजी गडदे, बाज, ता.जत
१८) श्री. तुकाराम यशवंत गडदे, बाज, ता.जत
१९) श्री. ज्ञानु धुळा गडदे, बाज, ता.जत
२०) श्री. विठोबा मारूती गडदे, बाज, ता.जत
२१) श्री. साधू तातोबा खांडेकर, बिरनाळ, ता.जत
२२) श्री. रावसाहेब शंक–याप्पा बेळगी, मेंढीगिरी, ता.जत
२३) श्री. शिवाजी गणू दुधाळ, देवनाळ, ता.जत
२४) श्री. आप्पालाला मेहबूब मुजावर, आसंगी तु.,ता.जत
२५) श्री. ज्ञानू कृष्णा पाटील, घोलेश्वर, ता.जत
२६) श्री. पांडुरंग रामचंद्र जमदाडे, गिरगांव, ता.जत
२७) श्री. ज्ञानोबा महादेव निकम, शेगांव, ता.जत
२८) श्री. बाबू भिरू सोनुरे, अचकनहळ्ळी, ता.जत
२९) श्री. आण्णू बाळू बुरूंगळे, नवाळवाडी, ता.जत
३०) श्री. ज्ञानेश्वर केशव मोरे, आमृतवाडी, ता.जत
३१) श्री. भगवान बंडू पुजारी, कोसारी, ता.जत

वरील ग्राहकांचे अंदाजपत्रकात एकूण किती ग्राहक समाविष्ट होते व त्यांचा वीज पुरवठा करण्यासंबंधी सद्य:स्थितीचा अहवाल या मंचास दि. ३०/८/२००६ रोजी मिटिंगच्यावेळेस सादर करावा. तसेच कनेक्शन दिले असल्यास कनेक्शन दिलेची तारीख अथवा प्रतिक्षा यादीतील क्रमांक नमूद करावा.

सदस्य – सचिव
ग्राहक तक्रार निवारण मंच(CGRF)
मराविविकंलि, कोप, कोल्हापूर

१) श्री. आण्णासो आप्पासो बिराजदार,
मु.पो. काराजनगी,
ता. जत, जि. सांगली.

२) श्री. गुलाबराव भाऊसाहेब करे,
मु.पो. करेवाडी खुर्द,
ता. जत, जि. सांगली.

३) श्री. पांडुरंग कृष्णा माने,
मु.पो.येळावी,
ता. जत, जि. सांगली.

४) श्री. भिमू बाळकू सावंत,
मु.पो. माडग्याळ,
ता. जत, जि. सांगली.

५) श्री. यल्लाप्पा कल्लाप्पा माळी,
मु.पो. व्हसपेठ,
ता. जत, जि. सांगली.

६) श्री. महादेव रेवाप्पा माळी,
मु.पो. व्हसपेठ,
ता. जत, जि. सांगली.

७) श्री. शंकर तुका गोधे,
मु.पो. बाज,
ता. जत, जि. सांगली.

८) श्री. ईश्वरा भैरू माने,
मु.पो. बागेवाडी,
ता. जत, जि. सांगली

१६) श्री. बाळासाहेब शिवलिंग कुंभारे,
मु.पो.बाज,
ता. जत, जि. सांगली.

१७) श्री. गुंडा बाबाजी गडदे,
मु.पो.बाज,
ता. जत, जि. सांगली.

१८) श्री. तुकाराम यशवंत गडदे,
मु.पो.बाज,
ता. जत, जि. सांगली.

१९) श्री. ज्ञानु धुळा गडदे,
मु.पो.बाज,
ता. जत, जि. सांगली.

२०) श्री. विठोबा मारूती गडदे,
मु.पो.बाज,
ता. जत, जि. सांगली.

२१) श्री. साधू तातोबा खांडेकर,
मु.पो.बिरनाळ,
ता. जत, जि. सांगली.

२२) श्री. रावसाहेब शंक–याप्पा बेळगी,
मु.पो.मेंढीगिरी,
ता. जत, जि. सांगली.

२३) श्री. शिवाजी गणू दुधाळ,
मु.पो.देवनाळ,
ता. जत, जि. सांगली.

९) श्री. भाऊ नाना यमगर,
मु.पो. कोसारी,
ता. जत, जि. सांगली.

१०) श्री. वसंत बंडू कोडग,
मु.पो. शेगांव,
ता. जत, जि. सांगली.

११) श्री. दिगंबर बंडू कोडग,
मु.पो. शेगांव,
ता. जत, जि. सांगली.

१२) श्री. प–याप्प शंक–याप्पा केंपवाड,
मु.पो.खोजनवाडी,
ता. जत, जि. सांगली.

१३) श्री. आंबाण्णा लक्ष्मण माळी,
मु.पो.उमराणी,
ता. जत, जि. सांगली.

१४) श्री.यल्लाप्पा दादा मालेकर,
मु.पो.अचकहळळी, ता.जत
ता. जत, जि. सांगली.

१५) श्री. बाळू भंगाप्पा रूपनुर,
मु.पो.बाज,
ता. जत, जि. सांगली.

२४) श्री. आप्पालाला मेहबूब मुजावर,
मु.पो.आसंगी तु.,
ता. जत, जि. सांगली.

२५) श्री. ज्ञानू कृष्णा पाटील,
मु.पो.घोलेश्वर,
ता. जत, जि. सांगली.

२६) श्री. पांडुरंग रामचंद्र जमदाडे,
मु.पो.गिरगांव
ता. जत, जि. सांगली.

२७) श्री. ज्ञानोबा महादेव निकम,
मु.पो.शेगांव,
ता. जत, जि. सांगली.

२८) श्री. बाबू भिरू सोनुरे,
मु.पो.अचकनहळ्ळी
ता. जत, जि. सांगली.

२९) श्री. आण्णू बाळू बुरूंगळे,
मु.पो.नवाळवाडी,
ता. जत, जि. सांगली.

३०) श्री. ज्ञानेश्वर केशव मोरे,
मु.पो.आमृतवाडी,
ता. जत, जि. सांगली.

३१) श्री. भगवान बंडू पुजारी,
मु.पो.कोसारी,
ता. जत, जि. सांगली.

श्री. हरिभाऊ दिगंबर खापरे,  सह–सचिव,
जत तालुका विद्युतधारक असोसिएशन,
कै.ह.भ.प.नारायणराव जगताप चॅरीटेबल ट्रस्ट,
हॉटेल वृंदावन जवळ, विजापूर रोड,
जत–४१६४०४, जि. सांगली.